पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०९६/२०१७
दिनांक : ०१/०९/२०१७

प्रति,
मा.......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दिनांक **०६/०९/२०१७** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **०६/०९/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.
मा.महिला व बालकल्याण समिती सभा
कार्यपत्रिका क्रमांक – १०

दिनांक – **०६/०९/२०१७** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **०६/०९/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **१६/०८/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ०९ )** सभावृत्तांत कायम करणे.

--------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत महिलांच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये महिलांना चार चाकी हलके वाहन ( L.M.V.) चालविण्याचे (मोटार ड्रायव्हिंग) (T.R) प्रशिक्षण देणे ही योजना सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या अटी/शर्तीनुसार वस्तीपातळीवर राबविणेस तसेच या योजनेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बाल कल्याण योजने अंतर्गत इ.८ वी ते १२ वी मध्ये शिकत असणा-या मुलींना मोफत सायकल वाटप व महिलांना मोफत शिलाई मशीन वाटप या दोन योजना कार्यान्वयीत आहेत. तथापि शासन निर्णय क्रमांक : डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७ दि.०५/१२/२०१६ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांनी कल्याणकारी योजनांतर्गत साहित्या ऐवजी रोख स्वरुपात शासन निर्णयात नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार लाभ देण्यात यावा असे नमुद केलेले आहे. त्या अनुषंगाने या दोन योजनांमध्ये दुरुस्ती करणे तसेच पाळणाघरांना अर्थसहाय्य देणे या योजनेत संस्था नोंदणी कालावधी तीन

वर्षांऐवजी दीड वर्षे करणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावात नमुद प्रपत्र "अ" "ब" "क" नुसार या योजनांमधील दुरुस्तीस मान्यता देणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८. नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/१०९६/२०१७
दिनांक : ०१/०९/२०१७ चे लगत.

टिप – प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – 411 018**
**महिला व बाल कल्याण योजना**
**प्रपत्र अ (विषय क्रमांक ०१ चे लगत)**

**महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत महिलांना चार चाकी हलके वाहन ( L.M.V.) चालविण्याचे ( मोटार ड्रायव्हिंग ) ( T.R.) प्रशिक्षण देणेबाबत.**

**<u>महिला लाभार्थ्यांसाठी पात्रता निकष (अटी व शर्ती)</u>**

१. महिला / मुलीच्या नावे आधारकार्ड / आधारकार्ड काढले बद्दलची पोच पावती ची साक्षांकित सत्यप्रत आवश्यक.

२. पिं.चिं.म.न.पा.हद्दीत वास्तव्य असणे आवश्यक.

३. वास्तव्याच्या पुराव्यार्थ महिलांच्या नावे / नाव असलेले:- आधारकार्ड / आधारकार्ड काढलेबद्दलची पोच पावती / घरपट्टी ( मिळकतकर ) पावती / पिं.चिं.म.न.पा.कडिल झोपडपट्टीधारक म्हणुन ओळखपत्र / मतदार ओळखपत्र / विद्युत बिल / टेलिफोन बील/ राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक / रेशनकार्ड. यापैकी कोणताही एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) पुराव्यार्थ सादर करावे लागेल.

४. वय वर्ष २० पूर्ण असणे आवश्यक पुराव्यार्थ जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. प्रमाणपत्र, इत्यादी तत्सम कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक.

५. इयत्ता ८ वी पास असणे आवश्यक. पुराव्यार्थ शैक्षणिक अर्हते संबधितचा दाखला (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक.

६. एकुण प्रशिक्षण शुल्काच्या १०% इतकी रक्कम सहभाग शुल्क म्हणुन आगाऊ भरणे आवश्यक.

७. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न १,००,०००/- पर्यंत असणे आवश्यक उत्पनाचे पुराव्यार्थ मा.तहसिलदार / तत्सम अधिका-यांकडील उत्पन्नाचा दाखला. / पिवळे व केशरी रेशनकार्डवरील रक्कम रुपये १,००,०००/- पर्यंतचे नमूद उत्पन्न (साक्षांकित सत्यप्रत.) आवश्यक.

८. शिकाऊ अनुज्ञप्तीसाठी २ व पक्की अनुज्ञप्तीसाठी २ असे नजिकच्या कालावधीत काढलेले एकुण ४ फोटो (पासपोर्ट साईज) आवश्यक.

९. याव्यतिरिक्त परिवहन कार्यालयाच्या मागणीनुसार आवश्यक ती कागदपत्रे / साक्षांकित सत्यप्रत. सादर करणे बंधनकारक राहील.

१०. नाव बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय राजपत्र, रक्कम रुपये १००/- चे स्टॅम्प पेपर वरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक.

सही/-
**आयुक्त.**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी-१८.**